# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील तेहतिसावा रविवार - १९ नोव्हेंबर २०२३

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः वंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपले पाळकीय कार्य जबाबदारीने व विश्वासाने करण्यास पवित्र आत्म्याची कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी विश्वासू दासाप्रमाणे नेहमी सामान्य जनतेच्या हितासाठी व उन्नतीसाठी कार्य करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. परमेश्वराने आपल्याला अनेक कलागुणांनी संपन्न केले आहे. मोठया विश्वासाने परमेश्वराच्या ह्या दानांचा वापर चर्चच्या उपकमात सकिय सहभाग घेऊन समाजाच्या हितासाठी आपल्याला करता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. प्रथम ख्रिस्तशरीर स्वीकारणा-या मुलांना प्रभू भोजनाचे महत्त्व कळावे व स्वर्गीय भाकरीसाठी त्यांनी नेहमी उत्सुक असावे तसेच त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना प्रभूने आशीर्वादित करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेष करून जे आजारी आहेत त्यांच्यावर प्रभूचा वरदहस्त असावा, जगात सर्वत्र शांती प्रस्थापित व्हावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.